महावितरण

# जाहीर सूचना

शिकाऊ उमेदवाराची भरती प्रक्रिया (2020-2021) करीता महावितरण चंद्रपूर मंडल कार्यालय अंतर्गत चंद्रपूर/वरोरा/बल्लारशा विभाग यांच्या आस्थापनेवरील विजतंत्री /तारतंत्री/कोपा (COPA) या प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवार पदाच्या एकूण 126 जागा भरण्यासाठी दिनांक 20.10.2020 ते 30.10.2020 पर्यंत सायं.05.30 वाजेपर्यंत https://apprenticshipindia.org/login या संकेत स्थळावर चंद्रपूर मंडला अंतर्गत खालील आस्थापना रजिस्ट्रेशन क्रमांकावर ऑनलाईन (Online) अर्ज मागविण्यात येत आहेत. पदाचा ट्रेड हा Electrician/Wireman/ COPA करीता शिकाऊ उमेदवाराचा कालावधी हा 1 वर्षाकरीता असुन जागा खालील प्रमाणे आहेत.

| विभागाचे नाव | रजिस्ट्रेशन क्रमांक | व्यवसाय (Tread) | | | एकुण जागा |
|---|---|---|---|---|---|
| | | विजतंत्री (Electrical) | तारतंत्री (Wireman) | कोपा (COPA) | |
| चंद्रपूर विभाग | E03172701973 | 25 | 16 | 10 | 51 |
| वरोरा विभाग | E04172702364 | 17 | 14 | 6 | 37 |
| बल्लारशा विभाग | E03172702034 | 20 | 10 | 8 | 38 |
| | | 62 | 40 | 24 | 126 |

(टिप- चंद्रपुर जिल्हातील उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल)

1) <u>शौक्षणीक अर्हता</u> :- महाराष्ट्र राज्य शालांत परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उतीर्ण व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री/तारतंत्री/कोपा या व्यवसायात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

2) <u>वयोमर्यादा</u> :- दिनांक 20.10.2020 रोजी वय 18 ते 33 वर्ष मागासवर्गीयासाठी 05 वर्षे शिथिलक्षम.

3) <u>विद्यावेतन</u> :- नियमाप्रमाणे लागु राहील

4) पद कमी जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापनाकडे राखीव असतील व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

5) एस. एस. सी. उतीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्राची प्रत आधरकार्डच्या नावाशी सुसंगत असलेली माहिती भरावी.

6) आय.टी. आय. उतीर्ण प्रमाणपत्राची साक्षांकिंत प्रत (चार सेमिस्टर गुणपत्रिका)

7) उमेदवाराने मागास प्रवर्गात अर्ज केला असल्यास जात प्रमाणपत्र साक्षांकित केलेली छायांकित प्रत असणे आवश्यक आहे.

8) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकिय किंवा इतर अधिकाऱ्याकडून दबाव आणल्यास आपली उमेदवारी रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

9) उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज सादर न केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी, तसेच उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करतांना पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्र स्कॅन करून योग्य रितीने अपलोड करणे आवश्यक आहे.

10) वरील कालावधीत अर्ज सादर न केल्यास त्यानंतरच्या कालावधीच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

11) ऑनलाईन (Online) अर्ज सादर करतांना उमेदवाराने सद्यस्थितीत कार्यान्वित असलेले स्वत:चा E-mail Id व Mobile No. नोंदविणे आवश्यक राहील.

12) उमेदवारांची निवड ही आय.टी.आय. मधील प्राप्त गुणपत्रीकेच्या गुणवत्ते नुसार (Merit List) निवड करण्यात येईल

13) उमेदवाराने कोणत्याही एका विभागासाठी ऑनलाईन अर्ज सादर करावा एका पेक्षा जास्त विभागामध्ये अर्ज सादर केल्यास त्या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही.

14) उमेदवाराने ज्या विभागात ऑनलाईन अर्ज केला त्या विभागात दिनांक 25.10.2020 ते 05.11.2020 या कालावधीत ॲनलाईन अर्जाची प्रत एस.एस.सी. गुणपत्रीका व प्रमाणपत्र, आय.टी. आय. गुणपत्रीका (चार सेमीस्टर), आधार कार्ड, जात प्रमाणपत्र इत्यादी सादर करावे . जे उमेदवार वरिल कागदपत्र सादर करणार नाही त्याचा निवड प्रक्रियेसाठी विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

(पी.आर.ओ चंद्रपूर नं.105 दि. 09.10.2020)

अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. सं.व सु. मंडल, चंद्रपूर